आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२२ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये अतिरिक्त निधी केंद्र सरकारला द्यायला रिझर्व्ह बँकेची मंजुरी
- आचारसंहितेचं उल्लंघन करणारी विधानं करू नयेत अशा अधिकृत सूचना उमेदवार आणि स्टार प्रचारकांना देण्याचे निवडणूक आयोगाचे भाजपा आणि काँग्रेसच्या अध्यक्षाना निर्देश
- पश्चिम बंगालमध्ये वर्ष २०११ पासून जारी केलेली इतर मागास प्रवर्गाची ५ लाख प्रमाणपत्रं रद्द करण्याचा कोलकाता उच्च न्यायालयाचा आदेश
- पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या आठ सदस्यांनाचा जामीन सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

  **आणि**
- इराणचे माजी अध्यक्ष, परराष्ट्र मंत्री आणि इतरांच्या अंत्ययात्रेला सुरुवात

**<><><><><>**

२०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये अतिरिक्त निधी केंद्र सरकारला द्यायला रिझर्व्ह बँकेनं मंजुरी दिली आहे. रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या आज मुंबईत झालेल्या ६०८ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भारतीय अर्थव्यवस्था लवचिक आणि मजबूत असल्यानं केंद्रीय राखीव निधी साडेसहा टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी या बैठकीत घेतला आहे.

रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल आणि आर्थिक विवरण तसंच जागतिक आणि देशांतर्गत आर्थिक स्थितीवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. रिझर्व्ह बँकेचे उच्च अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

आचारसंहितेचं उल्लंघन करणारी कोणतीही विधानं करू नयेत अशा अधिकृत सूचना आपल्या पक्षाचे उमेदवार आणि स्टार प्रचारकांना द्या, असे निर्देश निवडणूक आयोगानं भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना दिले आहेत. समाजातले भेद आणि सामाजिक तणाव वाढवेल असं कोणतंही कृत्य कोणताही पक्ष किंवा उमेदवारान करू नये, असं आयोगानं या दोन नेत्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

<><><><>

पश्चिम बंगालमध्ये वर्ष २०११ पासून जारी करण्यात आलेली इतर मागास प्रवर्गाची ५ लाख प्रमाणपत्रं रद्द करण्याचा आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं आज दिला. संबंधित कायद्यांतर्गत नोकरी मिळालेल्या किंवा या आरक्षणाच्या आधारे सेवा बजावत असलेल्यांवर या निर्णयाचा काहीही परिणाम होणार नाही, असंही न्यायमूर्ती तपव्रत चक्रवर्ती आणि राजशेखर मंथा यांच्या खंडपीठानं स्पष्ट केलं.

<><><><>

उत्तर प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीच्या ६ व्या आणि ७ व्या टप्प्यातला प्रचार शिगेला पोहचला असून विविध पक्षांचे स्टार प्रचारक जोरदार प्रचार करत आहेत.

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशमध्ये प्रचार सभा घेतल्या. विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी भाजपाला मत देण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी बस्ती जिल्ह्यातल्या प्रचार सभेत बोलताना केलं. यापूर्वी पार पडलेल्या निवडणुकीच्या ५ टप्प्यात भाजपाला बहुमत मिळालं असल्यानं विरोधी पक्ष भांबावला आहे, असंही ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी श्रावस्ती जिल्ह्यातही प्रचारसभा घेतली. या सभेत त्यांनी इंडीया  आघाडीवर कडाडून टीका केली.

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जौनपूर आणि बस्ती जिल्ह्यात प्रचार सभा घेतल्या. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी महाराजगंज आणि कुशीनगर जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी आझमगड इथं प्रचार सभा घेतली.

<><><><><>

काँग्रेसच्या स्टार प्रचारक प्रियांका गांधी यांनी आज झारखंडच्या गोड्डा इथं न्याय संकल्प यात्रेत भाजपाप्रणित केंद्र सरकारवर निशाणा साधला. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना खोट्या प्रकरणात अटक करण्यात आल्याचा, तसंच काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये, यासाठी पक्षाची बँक खाती गोठवल्याचा आरोप त्यांनी केला. महागाई आणि बेरोजगारी हे आज देशासमोरचे सर्वात गंभीर दोन प्रश्न आहेत, मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावर काहीही भाष्य करत नाहीत, अशी टीका प्रियांका यांनी केली.

दरम्यान, भाजपा नेते आणि आसामचे मुख्यमंत्री हेमंत विश्व शर्मा यांनी धनबाद इथं प्रचारसभेला संबोधित केलं. झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष विभाजनवादी राजकारण करत असल्याची टीका त्यांनी केली. मतदारांनी भाजपाच्या उमेदवाराला निवडून द्यावं, असं आवाहनही शर्मा यांनी केलं.

<><><><><>

हरयाणातल्या दहा जागांसाठी येत्या शनिवारी मतदान आहे त्यामुळे हरयाणात प्रचार शिगेला पोचला आहे. काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी आज महेंद्रगढ भिवानी लोकसभा मतदारसंघातल्या चरखी दादरी इथल्या प्रचारसभेत बोलताना अग्नीवीर योजनेवर टीका केली. इंडिया आघाडी सत्तेवर आली तर ही योजना रद्द होईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि कृषी उत्पादनांना हमीभाव देण्यांचं आश्वासनही त्यांनी दिलं. महागाईवरही त्यांनी टीका केली.

भाजपानं लष्करातल्या निवृत्तांसाठी वन रँक वन पेन्शन योजना आणल्याचं भिवानी इथं प्रचारसभेत बोलताना भाजपा नेते आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी सांगितलं.

<><><><><>

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेच्या आठ सदस्यांना मद्रास उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिलेला जामीन सर्वोच्च न्यायालयाने आज रद्द केला आणि त्यांना आत्मसमर्पण करायला सांगितलं. मद्रास उच्च न्यायालयानं १९ ऑक्टोबर २०२३ रोजी या आठ जणांना दिलेल्या जामिनाविरोधात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि न्यायमूर्ती पंकज मित्तल यांच्या खंडपीठानं आज त्यांचा जामीन रद्द केला. देशाची सुरक्षा नेहमीच सर्वोच्च असते. हिंसात्मक किंवा अहिंसात्मक, कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला आळा घालणं गरजेचं असतं, असं मत खंडपीठानं सुनावणीदरम्यान मांडलं.

<><><><><>

इराणचे माजी अध्यक्ष दिवंगत एब्राहिम रईसी, परराष्ट्र मंत्री होसैन अमीर अब्दोल्लाहियान आणि इतरांच्या अंत्ययात्रेला इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्लाह अली खामेनेई यांच्या उपस्थितीत आज सुरुवात झाली. खामेनेई यांच्या नेतृत्वात मृतांच्या शवपेटिकांसमोर प्रार्थनासभा झाली. त्यानंतर मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्ययात्रा तेहरान विद्यापीठाकडून स्वातंत्र्य चौकाकडे रवाना झाली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यासह इतर देशांचे प्रतिनिधी, तसंच अनेक राजकीय आणि लष्करी उच्चाधिकारी यावेळी उपस्थित होते. इराणच्या वायव्य भागात झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात रईसी यांच्यासह इतरांचा मृत्यू झाला होता. रईसी यांचा दफनविधी मशहद या त्यांच्या मूळ गावी उद्या होणार आहे.

<><><><><>

पुण्याच्या कल्याणीनगरमधल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल, संबंधित बारचे चालक जितेश शेवनी आणि जयेश बोनकर अशा तिघांना आज सत्र न्यायालयानं २४ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

दरम्यान, विशाल अग्रवाल याला न्यायालयात घेऊन आलेल्या पोलिसांच्या वाहनावर शाई फेकणाऱ्या काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयानं तिघांची रवानगी पोलीस कोठडीत केली. १९ मे रोजी पहाटे अडीचच्या सुमाराला झालेल्या या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

देशाच्या सागरी सीमांशी संबधित हितरक्षणासाठी भारतीय नौदल नेहमी सुसज्ज असणं आवश्यक आहे असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश त्रिपाठी यांनी केलं. ते नवी दिल्ली इथं नौदल मुख्यालयात नौदल अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. भारतीय नौदलाने आत्मनिर्भर होण्यावर भर दिल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यपाल रमेश बैस यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त राज्यातल्या जनतेला नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी दिलेली अहिंसा, शांती आणि करुणेची शिकवण व्यक्ती, समाज तसेच राष्ट्रांना नेहमीच मार्गदर्शक आहे. आज ही शिकवण पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असं राज्यपालानी आपल्या संदेशात म्हटले आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही बुध्दपौर्णिमेनिमित्त सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. बौद्ध धम्म हेच लोकशाही विचारांचं उगमस्थान आहे, विश्वशांती, अहिंसा, समता, विश्वबंधुतत्व

आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बौध्द धम्मानंच जगाला दिला. युध्दाच्या रक्तपातापासून जगाला वाचवण्यासाठी आजही जगाला भगवान बुध्दाच्या विचारांची गरज आहे, असं आठवले यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अवयवदान प्रक्रियेतली दिरंगाई टाळण्यासाठी दाता आणि रुग्ण यांच्यामधल्या कागदपत्रांच्या त्रुटीबाबत त्यांना वॉट्सअप किंवा इमेलवर संपर्क कळवलं गेलं पाहिजे असा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. अवयवदानासाठी सुरळीत आणि तत्पर नोंदणी प्रकिया आवश्यक असल्यावर न्यायाधीश प्रतिभा एम सिंग यांनी म्हटलं आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला न्यायालयानं मानवी अवयवांचे आणि उतींचे प्रत्यारोपण कायदा १९९४ चा आढावा घेतला होता. अवयव प्रत्यारोपण अर्जाची प्रक्रियेसाठी वेळेचं बंधन आवश्यक असल्याचं त्यावेळी न्यायालयानं अधोरेखीत केलं होतं.

**<><><><><>**

संसद भवनाच्या नॉर्थ ब्लॉकमध्ये असलेलं गृह मंत्रालयाचं कार्यालय बॉम्बनं उडवून देण्याच्या धमकीचा ईमेल आज मिळाल्यावर तात्काळ बॉम्ब शोधक पथक आणि अग्निशामक बंब घटनास्थळी पाठवण्यात आले. यासाठी शोध मोहिम चालवण्यात आली. मात्र काहीही संशयास्पद आढळून आलं नाही. हा ईमेल कोणी पाठवला आणि कुठून पाठवला याचा देखील शोध घेणे सुरू आहे.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस आज दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरिन क्षेत्र आणि दक्षिण बंगालच्या उपसागरात तसंच अंदमान-निकोबार बेटं आणि अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात पुढं सरकला

आहे. वातावरणात खालच्या थरातली वाऱ्याची द्रोणीय रेषा आज वायव्य राजस्थान ते कर्नाटकापर्यंत मध्य महाराष्ट्रामार्गे जात आहे.

येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात उत्तर-मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//